3 MAY 2017 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संवादातून सुसंस्कृत पिढी घडते

## देवानंद शिंदे : पोलीस महासंचालक यूथ चॅम्पियनशिप स्पर्धा

**कोल्हापूर** : बालगुन्हेगारीचे वाढते प्रमाण चिंताजनक असून, पोलीस आणि समाजातील सुसंवाद भविष्यात गुन्हेगारीचे प्रमाण कमी करुन सुसंस्कृत पिढी घडवू शकतो, असा आशावाद शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी व्यक्त केला.

पोलीस महासंचालक यूथ पार्लमेंट चॅम्पियनशिप वक्तृत्व स्पर्धेचा बक्षीस वितरण मंगळवारी केशवराव भोसले नाट्यगृहात झाला, त्यावेळी ते बोलत होते.

ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार म्हणाले, चांगली पिढी निर्माण करण्यासाठी कोणते कोर्सेस नाहीत; पण प्रबोधनाच्या माध्यमातून चांगला माणूस व चांगला समाज निश्चित घडू शकतो, यावर आपला विश्वास आहे. यावेळी परीक्षक न्यायाधीश उमेशचंद्र मोरे, प्रा. प्रकाश पवार यांनी मनोगत व्यक्त केले.

या स्पर्धेत सांगली, सोलापूर, पुणे, सातारा, कोल्हापूर जिल्ह्यांतील अकरा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयांनी सहभाग घेतला. यामध्ये सुलेखा हायस्कूलच्या संघाने विजेते पद पटकाविले, तर इचलकरंजीच्या बालाजी विद्यालयाने उपविजेते पद पटकाविले. यावेळी अप्पर पोलीस अधीक्षक डॉ. दिनेश बारी यांच्यासह पोलीस निरीक्षक, पोलीस विभागातील कर्मचारी उपस्थित होते.




पोलीस महासंचालकांच्यावतीने कोल्हापूर येथे मंगळवारी 'पोलीस महासंचालक यूथ पार्लमेंट चॅम्पियनशिप वक्तृत्व स्पर्धा' घेण्यात आली. विजेत्या सुलेखा हायस्कूलच्या विद्यार्थ्यांना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी गौरविले. यावेळी अप्पर पोलीस अधीक्षक दिनेश बारी, प्रकाश पवार, उमेशचंद्र मोरे, जयसिंगराव पवार, आदी उपस्थित होते.

### स्पर्धेतील उत्कृष्ट वक्ते

- पहिला - सुयश मुंडे (सुलेखा हायस्कूल, बार्शी-सोलापूर)
- दुसरा - शिवम गायकवाड(डी. एम. कवठेकर हायस्कूल, पंढरपूर)
- तृतीय - निशांत चौगले (बालाजी माध्यमिक विद्यालय, इचलकरंजी)

जनसंपर्क कक्ष

3 MAY 2017 महाराष्ट्र टाईम्स शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'जिओ-इन्फॉर्मेटिक्स'च्या नऊ विद्यार्थ्यांची निवड

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**



शिवाजी विद्यापीठाच्या भूगोल अधिविभागातील जिओ-इन्फॉर्मेटिक्स शाखेच्या नऊ विद्यार्थ्यांची इटलीच्या एसजीआय या बहुराष्ट्रीय कंपनीत निवड झाली आहे. कॅम्पस इंटरव्ह्यूच्या माध्यमातून ही निवड झाली आहे. या विद्यार्थ्यांची निवड ही जीआयएस एक्झिक्युटिव्ह व मॅनेजमेन्ट ट्रेनी या पदांसाठी करण्यात आली. या वर्षीच्या विद्यार्थ्यांसाठी कॅम्पस इंन्टरव्ह्यूचे आयोजन करण्यात आले होते. एसजीआय (स्टुडिओ गली इन्जेनेरिया) ही इटलीस्थित बहुराष्ट्रीय कंपनी असून या कंपनीचे काम जगातील वीसहून अधिक देशांमध्ये चालते. ही कंपनी प्रामुख्याने पर्यावरण,जल नियोजन, नागरीकरण व दळणवळण या क्षेत्रांत काम करते. अविनाश शिंदे, सागर चौगुले, सत्यवान धुमाळ, महादेव चव्हाण व सचिन गावडे या विद्यार्थ्यांचे भोपाळ (मध्यप्रदेश) या ठिकाणी 'जीआयएस एक्झिक्युटिव्ह' या पदावर तर, दीपाली पाटील, पूजा ढोबळे, दयानंद बोडके व योगेश काशीद यांची कोल्हापूर येथे 'मॅनजमेंट ट्रेनी' म्हणून निवड झाली आहे. या बॅचमधील काही विद्यार्थ्यांची निवड यापूर्वीच जेनेसिस, मुंबई व टेलिअटलास,पुणे या कंपन्यांत झाली आहे. अंतिम परीक्षेचा निकाल लागण्यापूर्वीच इतक्या महत्त्वाच्या कंपनीत नोकरीची संधी प्राप्त झाल्याने या विद्यार्थ्यांत आनंदाचे वातावरण आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या भूगोल विभागामध्ये पी.जी. डिप्लोमा इन जिओइन्फॉर्मेटिक्स हा अभ्यासक्रम २००८पासून चालविला जातो. यामध्ये डिजिटल इमेज प्रोसेसिंग, जिओग्राफिकल इन्फॉर्मेशन सिस्टिम, रिमोट सेन्सिंग या अभ्यासक्रमांचा समावेश आहे.

3 MAY 2017 सकाळ जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'भूगोल'च्या ९ विद्यार्थ्यांची निवड

कोल्हापूर, ता. २ : शिवाजी विद्यापीठाच्या भूगोल अधिविभागातील जिओ-इन्फॉर्मेटिक्स शाखेच्या नऊ विद्यार्थ्यांची एकाच वेळी इटलीच्या एस.जी.आय. या बहुराष्ट्रीय कंपनीत निवड झाली आहे. कॅम्पस इन्टरव्ह्यूच्या माध्यमातून ही निवड झाली.

या वर्षीच्या विद्यार्थ्यांसाठी कॅम्पस इंन्टरव्ह्यूचे आयोजन विभागातर्फे करण्यात आले होते. एस.जी.आय. (स्टुडिओ गली इन्जेनेरिया) ही इटलीस्थित बहुराष्ट्रीय कंपनी असून या कंपनीचे काम जगातील वीसहून अधिक देशांत चालते. ही कंपनी प्रामुख्याने पर्यावरण, जल नियोजन, नागरीकरण व दळणवळण या क्षेत्रांत काम करते. कॅम्पस इन्टरव्ह्यूअंतर्गत विभागातील एकूण नऊ विद्यार्थ्यांचे सिलेक्शन कंपनीमार्फत करण्यात



आले. या विद्यार्थ्यांची निवड ही जी.आय.एस. एक्झिक्युटिव्ह व मॅनेजमेन्ट ट्रेनी या पदांसाठी करण्यात आली. एस.जी.आय. (स्टुडिओ गली इंजेनेरिया इंडिया प्रा.लि.) कंपनीचे भारतातही अनेक ठिकाणी प्रकल्प सुरू आहेत. विभागातील अविनाश शिंदे, सागर चौगुले, सत्यवान धुमाळ, महादेव चव्हाण व सचिन गावडे या विद्यार्थ्यांचे भोपाळ (मध्यप्रदेश) या ठिकाणी 'जीआयएस एक्झिक्युटिव्ह' या पदावर तर, दीपाली पाटील, पुजा ढोबळे, दयानंद बोडके व योगेश काशीद यांची कोल्हापूर येथे 'मॅनेजमेंट ट्रेनी' म्हणून निवड झाली आहे. या बॅचमधील काही विद्यार्थ्यांची निवड यापूर्वीच जेनेसिस, मुंबई व टेलिॲटलास, पुणे या कंपन्यांत झाली आहे. अंतिम परीक्षेचा निकाल लागण्यापूर्वीच इतक्या महत्त्वाच्या कंपनीत नोकरीची संधी मिळाली आहे.

भूगोल विभागाचे प्रभारी विभागप्रमुख डॉ. पी. एन. भोसले, पी. जी. डिप्लोमा इन जिओ-इन्फॉर्मेटिक्सचे समन्वयक डॉ. एस. एस. पन्हाळकर यांनी इंटरव्ह्यूच्या आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले. त्यांना डॉ. एस. डी. शिंदे, डॉ. पी. टी. पाटील, श्रीमती विद्या चौगुले यांचे सहकार्य मिळाले.